गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

यश सिद्धि न्यूज

Titie code MAHMAR 52037

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १२२ | बुधवार ०३ मे २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 122 | Date : 03/05/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

# शरद पवारांचे खळबळजनक विधान

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून शरद पवार निवृत्त; स्वत: केली घोषणा

मुंबईः राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून आपण निवृत्त होत आहोत, अशी घोषणा शरद पवार यांनी केली आहे. तसेच, यापुढे कुठलीही निवडणूक लढवणार नाही, असेही त्यांनी जाहीर केले आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात 'लोक माझे सांगाती' या राजकीय आत्मचरित्राच्या सुधारित आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात शरद पवारांनी ही घोषणा केली. शरद पवार यांनी कार्यक्रमात ही घोषणा करताच समोर उपस्थित राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी या निर्णयाला जोरदार विरोध केला. शरद पवार आपला निर्णय मागे घेत नाही, तोपर्यंत सभागृह सोडणार नाही, असा पवित्रा कार्यकर्त्यांनी घेतला.

शरद पवारांनी निवृत्तीची घोषणा करताच सभागृहातील अनेक नेते व कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले. धनंजय मुंडेंसह काही नेत्यांनी तर व्यासपीठावर जात शरद पवारांचे पाय धरले. यावेळी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना शांत राहण्याची विनंती केली. मात्र, नेते व कार्यकर्त्यांच्या या भूमिकेवर शरद पवार आता काय बोलतात? आपला निर्णय मागे घेणार का?, याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. 'लोक माझे सांगाती'चे पुस्तक प्रकाशन झाल्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना शरद पवार म्हणाले, कुठे थांबायच हे मला कळत. गेली सहा दशके राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावर काम केल्यानंतर मी आता निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे काही जणांना अस्वस्थ वाटेल. मात्र, मी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे.

शरद पवार म्हणाले, आता राष्ट्रवादी काँग्रेसने एक समिती नेमावी. या समितीमध्ये प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, अजित पवर, जंयत पाटील, सुप्रिया सुळे, छगन भुजळ, जितेंद्र आव्हाड, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, फौजिया खान, झिरवळ आदी असतील. राष्ट्रवादी काँग्रेसची जबाबदारी कोणाकडे सोपवायची, याचा निर्णय या समितीने घ्यावा. सर्व कार्यकर्ते, नेत्यांना अधिकाधिक वेळ देणार, सर्वांना सोबत घेऊ जाणारा, असा अध्यक्ष निवडावा.



राष्ट्रवादीचा अध्यक्ष निवडताना, या सर्वांचा विचार करावा.

आपण केवळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होत आहोत. ही सार्वजनिक निवृत्ती नाही, असेही शरद पवारांनी स्पष्ट केले. गेली सहा दशके मी जनसामान्यांसाठी जे काम करत गेलो आहे, त्या सेवेत आताही खंड पडू देणार नाही. विकास, शेती अशा काही क्षेत्रासाठी मी आता अधिक वेळ देईल, असे शरद पवार म्हणाले.

## शरद पवार यांनी मागितला दोन दिवसांचा अवधी; अजित पवारांची माहिती

मुंबई : 'लोक माझे सांगाती' या शरद पवार यांच्या राजकीय आत्मकथेच्या सुधारित आवृत्तीच्या प्रकाशन कार्यक्रमात शरद पवार यांनी केलेल्या निवृत्तीच्या घोषणेची कुणालाच कल्पना नव्हती. तो त्यांचा निर्णय होता. मात्र नेते आणि कार्यकर्त्यांच्या भावना ऐकल्यानंतर त्यांनी राजीनाम्यासंदर्भात विचार करण्यासाठी दोन दिवसांचा अवधी मागितला आहे. तसेच जोपर्यंत कार्यकर्ते आपापल्या घरी परतत नाहीत तोपर्यंत आपण त्याच निर्णयावर ठाम राहू, अशी भूमिका शरद पवार यांनी घेतल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम पार पडत असतानाच, त्यांनी केलेल्या पक्षाच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याने देशाच्या राजकारणात एकच खळबळ उडाली. शरद पवार



यांनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याची घोषणा करताच कार्यकर्त्यांनी कार्यक्रम स्थळाच्या ठिकाणीच ठिय्या दिला आणि जोपर्यंत निर्णय मागे घेत नाहीत तोपर्यंत जागा सोडणार नाही, अशी आग्रही भूमिका घेतली. अनेक कार्यकर्ते यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पुढे तळ ठोकून बसले होते. जोपर्यंत शरद पवार निर्णय मागे घेणार नाहीत, तोपर्यंत आपण येथून उठणार नाही, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी । पान २ वर

## राज्यात १३९ नवे करोनाबाधित


मुंबई : करोना रुग्णांच्या संख्येत मागील काही दिवसांपासून सुरू असलेली घट मंगळवारीही कायम राहिली. राज्यात मंगळवारी १३९ नव्या करोना रुग्णांची नोंद झाली तर ७२० रुग्ण बरे झाले. त्यामुळे करोना रुग्णांच्या तुलनेत बऱ्या होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत आहे. राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.१३ टक्के झाले आहे. राज्यात मंगळवारी करोनाने एकाही रुग्णाच्या मृत्यूची नोंद झालेली नाही.

१ जानेवारीपासून आजपर्यंत ९७ कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सध्या राज्यातील मृत्युदर १.८१ टक्के एवढा आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ८ कोटी ७० लाख २ हजार ४२१ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ८१ लाख ६६ हजार २०७ (९.३९ टक्के) रुग्ण आढळले आहेत. राज्यात सक्रिय रुग्णांची संख्या ३ हजार ३५१ इतकी आहे. त्याचप्रमाणे राज्यात आतापर्यंत एक्सबीबी.१.१६ या करोना उपप्रकारचे ११११२ रुग्ण सापडले आहेत. त्यापैकी १० रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन टक्के प्रवाशांच्या चाचणीतून बाधित आढळलेल्या १०७ प्रवाशांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारण तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

## भ्रष्टाचार काँग्रेसचा आणि भाजपचाही..

## कर्नाटकातील प्रचाराची दिशा बदलली

नवी दिल्ली: काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांना लोकसभेतून बडतर्फ करण्याचे 'रामायण' ज्या कोलारमधील सभेमुळे घडले, तिथे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जंगी जाहीर सभा घेऊन कर्नाटकमधील अखेरच्या टप्प्यातील प्रचाराची दिशा निश्चित केली. कर्नाटकमधील भाजपचे सरकार हे ४० टक्के कमिशनवाले सरकार असल्याच्या काँग्रेसच्या टीकेला भाजपला अजूनही तगडे प्रत्युत्तर देता आलेले नाही. भाजपच्या स्थानिक नेत्यांना वा मंत्र्यांना हा आरोप खोडून काढणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मोदींनी काँग्रेसच्या काळातील भ्रष्टाचार आणि घोटाळय़ांवर बोट ठेवून प्रदेश भाजपमधील नेत्यांना प्रचारासाठी थोडे बळ मिळवून दिले आहे. काँग्रेसची सरकारे ८५ टक्के



कमिशनवाली सरकारे होती, कर्नाटकमध्ये पुन्हा काँग्रेस सत्तेवर आला तर, राज्य भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकून पडेल असे मोदींचे म्हणणे होते. ८५ टक्क्यांचा संदर्भ देताना मोदींनी माजी पंतप्रधान राजीव गांधींच्या विधानाचा आधार घेतला. केंद्र सरकार एक रुपया खर्च करते, त्यातील फक्त १५ पैसे । पान २ वर

## 'राजद्रोह' कायद्यातील ब्रिटिशकालीन तरतुदींचा फेरविचार; केंद्राची सर्वोच्च न्यायालयात ग्वाही

नवी दिल्ली : ब्रिटिशांच्या काळातील राजद्रोह कायद्याच्या दंडात्मक तरतुदींचा फेरविचार करण्याबाबत आपण सल्लामसलतीच्या बऱ्याच पुढच्या टप्प्यावर असल्याचे सोमवारी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितले. त्यानंतर या कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी न्यायालयाने पुढे ढकलली. भारतीय दंड संहितेच्या कलम १२४ अचे पुनरीक्षण करण्याची प्रक्रिया सरकारने सुरू केली असल्याबाबत महान्यायवादी आर. वेंकटरामानी यांनी केलेल्या निवेदनाची सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड व न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या खंडपीठाने दखल घेतली. याचिकांमध्ये दंडात्मक तरतुदीच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देण्यात आले आहे. सल्लामसलतीची प्रक्रिया प्रगत टप्प्यावर असून, मसुदा संसदेपुढे जाण्यापूर्वी तो आपल्याला दाखवण्यात येणार असल्याचे वेंकटरामानी यांनी सांगितले. तर ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी याप्रकरणी सात न्यायाधीशांचे घटनापीठ स्थापन करावे, अशी विनंती न्यायालयाला केली. त्यावर हे प्रकरण सात जणांच्या घटनापीठाकडे पाठवायचे असेल, तरी त्याआधी पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर यावे लागेल, असे खंडपीठाने स्पष्ट केले. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी संसदेच्या पावसाळी अधिवेशनानंतर ठेवण्याची विनंती वेंकटरामानी यांनी खंडपीठाला केली. त्यावर न्यायालयाने ऑगस्टच्या दुसऱ्या आठवडय़ात सुनावणी ठेवण्यात येईल, असे स्पष्ट केले.

११ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालात केंद्र सरकार ब्रिटिश काळातील राजद्रोहाच्या कायद्यातील तरतुदींचा फेरविचार करत नाही, तोपर्यंत केंद्र आणि राज्य सरकारांनी या कायद्यांतर्गत कोणावरही गुन्हा दाखल करू नये, । पान २ वर

## राहुल गांधी यांच्या शिक्षेला अंतरिम स्थगितीस नकार

### गुजरात उच्च न्यायालयात सुट्टीनंतर सुनावणी



अहमदाबाद : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधातील अवमान खटल्यात सुरत सत्र न्यायालयाच्या निकालास अंतरिम स्थगिती देण्यास गुजरात उच्च न्यायालयाने मंगळवारी नकार दिली. तसेच या प्रकरणाची सुनावणी आता न्यायालयाच्या उन्हाळी सुट्टीनंतर घेण्यात येईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. २०१९मध्ये कर्नाटकातील प्रचारसभेत गांधी यांनी पंतप्रधानांवर टीका करताना 'सर्व चोरांची नावे मोदी कशी असतात,' असा सवाल केला होता. त्यानंतर गुजरातमधील भाजप आमदार पुर्णेश मोदी यांनी गांधींविरोधात अवमान याचिका । पान २ वर

## नियमित योग केल्याने शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते : योग गुरु मनमोहन भुतडा

### केंद्रीय संचार ब्युरो आणि शहरातील ११ योग मंडळांचा विशेष उपक्रम

सोलापूर/प्रतिनिधी : योगसाधनेच्या निरंतर अभ्यासामुळे शरीर, मन आणि आत्मा यांची सांगड घातली जाते. ते एकमेकांना जोडले जावून त्यांच्यातील समतोल राखण्यास मदत होते. नियमित योग केल्याने शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते असे प्रतिपादन योग सेवा मंडळाचे अध्यक्ष मनमोहन भुतडा यांनी आज येथे केले. २१ जून रोजी होणाऱ्या ९ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रिय संचार ब्यूरो, सोलापूर आणि योग सेवा मंडळ, यांचे सयुंक्त विद्यमाने दिनांक २ मे ते २० जून २०२३ पर्यंत सकाळी ५.४५ ते ०७.०० वाजेपर्यंत शिवस्मारक सभागृह, नवी पेठ, सोलापूर येथे आयोजित विशेष योग अभ्यास शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

सोलापूर शहरातील योग समन्वय समिती, पतंजली योग पीठ, विवेकानंद केंद्र, भारतीय योग संस्था, गीता परिवार, सर्व कल्याण योग स्काय, योग साधना मंडळ, सोलापूर । पान २ वर




## महाराष्ट्रदिनी जिल्ह्यात ९ ठिकाणी हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांचे लोकार्पण

सोलापूर/प्रतिनिधीः नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य शासनाने हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरू केली आहे. राज्यातील शहरी भागातील जनसामान्य गोरगरीब झोपडपट्टी भागात राहणाऱ्या नागरिकांसाठी वेळेवर व भक्कम आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी घोषित करण्यात आलेल्या या योजनेचे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून लोकार्पण करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ९ ठिकाणी आपले दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून हे दवाखाने नागरिकांच्या सेवेत समर्पित करण्यात आले.

जिल्ह्यातील आपला दवाखाना ठिकाणे पुढीलप्रमाणे – अक्कलकोट शहर – अक्कलकोट नगर परिषद नगरपालिका मराठी शाळा माणिक पेठ अक्कलकोट, बार्शी शहर – बार्शी नगरपरिषद लोढा प्लॉट बार्शी, माढा शहर – कुर्डूवाडी नगरपरिषद नागरिक आरोग्य केंद्र कुर्डवाडी, माळशिरस – माळशिरस नगरपंचायत नगरपंचायत इमारती आवार माळशिरस, मंगळवेढा शहर – मंगळवेढा नगरपरिषद योग भवन नाका मंगळवेढा, मोहोळ शहर – मोहोळ नगरपरिषद दत्त मंगल हॉल मोहोळ, पंढरपूर शहर – पंढरपूर नगरपरिषद क्लॉक रूम सांगोला नाका पंढरपूर. सांगोला शहर – सांगोला नगरपरिषद जि. प. शाळा चांदोलीवाडी सांगोला.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे । पान २ वर

## सुदानमधून आतापर्यंत १ लाख नागरिकांचे स्थलांतर

खार्तुम : सुदानमधील अंतर्गत संघर्षांमुळे आतापर्यंत १ लाख स्थानिकांनी देशाबाहेर स्थलांतर केल्याची माहिती संयुक्त राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्याशिवाय देशांतर्गत पातळीवर ३ लाख ३० हजारांपेक्षा जास्त नागिरकांनी आपापले घरदार सोडून दुसरीकडे आश्रय घेतला आहे. सुदानमधील हिंसाचारात आतापर्यंत किमान ४३६ सामान्य नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि बाराशेपेक्षा जास्त जखमी झाले आहेत. सुदानची सत्ता ताब्यात राखण्यासाठी जनरल अब्देल फताह अल–बुऱ्हान यांच्या नेतृत्वातील सैन्य (एसएएफ) आणि जनरल मोहम्मद हमदान दगालो यांच्या नेतृत्वाखालील निमलष्करी दल (आरएसएफ) या दोन गटांमध्ये १५ एप्रिलपासून हिंसक संघर्ष सुरू आहे. दोन्ही गटांनी शस्त्रविराम मान्य केला असला तरीही हिंसा थांबलेली नाही. राजधानी खार्तुम आणि इतर शहरांमध्ये बंदुकांचे आणि स्फोटांचे आवाज ऐकू येत असून त्यामुळे मदतकार्यात अडथळे येत असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या मदतकार्य अधिकाऱ्यांनी सांगितले. खार्तुमचा बराचसा भाग निर्मनुष्य झाला आहे. या हिंसाचाराचा सर्वाधिक फटका गरिबांना बसला आहे. सुदानमधील जवळपास दोनतृतीयांश नागरिक आधीपासूनच बाह्य । पान २ वर



दैनिक
यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

चांगला वक्ता हा जातिवंत वीर असतो.

## संपादकीय

# भाजपाची अडचण..

दिल्ली पोलीस महिला कुस्तीपटू भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात एफआयआर दाखल करणार आहेत. विनेश फोगट, बजरंग पुनिया आणि साक्षी मलिक यांच्यासारखे पदक विजेते कुस्तीपटू ब्रिजभूषण यांच्या विरोधात जंतरमंतरवर सहा दिवसांपासून आंदोलन करत आहेत. या कुस्तीपटूंनी ब्रिजभूषण यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. जानेवारीपासून हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. यावर काही कारवाई झाली नाही म्हणून कुस्तीपटू धरणे आंदोलनात सहभागी झाले. पत्रकार परिषदेत त्यांनी कुस्ती महासंघाच्या अध्यक्षांवर थेट आरोप केले. कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ आवाज उठत असल्याचे पाहून केंद्राने चौकशी समिती स्थापन करून कारवाईचे आश्वासन दिले. चौकशी समितीचा अहवाल प्रदीर्घ कालावधीनंतर आला, त्यावर पैलवानांचे समाधान झाले नाही. यानंतर हे कुस्तीपटू पुन्हा आंदोलनाला सामारे जात आहेत. अशा स्थितीत प्रश्न उपस्थित होतोय की ब्रिजभूषण यांच्यावर कारवाई न होण्यामागची कारणे काय आहेत? ब्रिजभूषण यांनी तीन वेगवेगळ्या लोकसभा जागांवर विजय मिळवला आहे. ब्रिजभूषण गोंडा येथून १९९१, १९९८, १९९९ मध्ये विजयी झाले होते. त्यानंतर २००४ मध्ये बलरामपूर येथून ते विजयी झाले. मात्र, २००८ ला ते भाजप सोडून सपामध्ये गेले. मनमोहन सिंग सरकार वाचवण्याची भूमिका त्यांनी बजावली. पक्ष बदलल्यानंतरही त्यांचे जनसमर्थन कमी झाले नाही आणि २००९ मध्ये ते सपामध्ये राहूनही कैसरगंज जागेवरून विजयी झाले. पुढे २०१३ ला मुझफ्फरनगर दंगलीनंतर ते भाजपमध्ये परतले. त्यानंतर २०१४ आणि २०१९ मध्ये भाजपने कैसरगंज मतदारसंघातून विजय मिळवला. म्हणजेच श्रावस्ती, बहराइच, गोंडा आणि कैसरगंज या जागांवर ब्रिजभूषण शरण सिंह यांचा थेट प्रभाव आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपसाठी या सर्व जागा खूप महत्त्वाच्या आहेत. अशा स्थितीत ब्रिजभूषण यांच्याविरोधात कोणतेही पाऊल उचलण्यास त्या कुचराई करत आहेत. २०२४ च्या निवडणुकीत ज्या जागांवर सपाचे वर्चस्व आहे त्या जागा जिंकण्यासाठी भाजपने तयारी केली आहे. जसे- मैनपुरी, रामपूर, आझमगड, रायबरेली. अशा परिस्थितीत ब्रिजभूषण सिंह यांच्यावर कठोर कारवाई झाल्यास किंवा ते पक्षाबाहेर गेल्यास या भागातील अनेक जागांवर भाजपची अडचण होऊ शकते.

# राज्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करा : मुख्यमंत्री

मुंबई : राज्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यात येत असल्याने राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्प, संरक्षित क्षेत्र व संरक्षित क्षेत्राच्या बाहेर वाघासह वन्यप्राण्यांची वाढ झाली आहे. भारतीय व्याघ्र प्रगणना २०२२ साठी करण्यात आलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये वाघांची संख्या ३१२ वरून ३९० झाली आहे. व्याघ्र प्रकल्पांच्या व्यवस्थापन प्रभावी मूल्यांकनात पेंच व्याघ्र प्रकल्प देशातील पहिल्या दहा प्रकल्पामध्ये आहे. त्याबद्दल आज झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाची २० वी बैठक झाली. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार नागपूर येथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. मंत्रालयातील मुख्यमंत्री समिती कक्षामध्ये झालेल्या या बैठकीस मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महीप गुप्ता आदींसह वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.राष्ट्रीय स्तरावर गेल्या चार वर्षांत वाघांची संख्या २९६७ वरून ३१६७ झाली आहे. ही वाढ ६.७४ टक्के असून त्या तुलनेत महाराष्ट्रात वाघांच्या संख्येत गेल्या चार वर्षांत २५ टक्के वाढ झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. दर चार वर्षांनी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणामार्फत व्याघ्र प्रकल्पांचे व्यवस्थापन प्रभावी मूल्यांकन केले जाते. २०२२ मध्ये झालेल्या या मूल्यांकनात पेंच व्याघ्र प्रकल्प देशात आठव्या क्रमांकावर आला आहे. अन्य व्याघ्र प्रकल्पांचा मूल्यांकन दर्जा देखील वाढला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.आज झालेल्या बैठकीत अभयारण्यातील व पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील, व्याघ्र भ्रमण मार्गातील विकास प्रकल्पांच्या प्रस्तावांवर चर्चा झाली.

यामध्ये प्रामुख्याने ब्रॉडबॅण्ड कनेक्टीव्हिटीसाठी भूमिगत ऑप्टीकल फायबर केबलचे प्रस्ताव, रस्ते प्रकल्पांचे प्रस्ताव तसेच अन्य विकास कामांच्या प्रस्तावांचा समावेश होता. आजच्या बैठकीत १९ प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारशीसाठी सादर करण्यात आले.यावेळी महाडाटा वेब पोर्टलचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्रात सुरू असणाऱ्या संशोधन प्रकल्पांच्या परिणामांसाठी एक प्रसार मंच म्हणून हे वेब पोर्टल विकसित करण्यात आले आहे. त्या वरील संशोधन प्रकल्पांमधून भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडूनद्वारे पुस्तके, जर्नल लेख, तांत्रिक अहवाल, एमएससी प्रबंध, पीएचडी शोध प्रबंध, इंटर्नशिप प्रबंध आणि लोकप्रिय लेख यांचा समावेश असणार आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगारांचे उद्धार कर्ते ...!

समग्र भारतातील कामगारांची अवस्था फारच बिकट अशी होती यासंदर्भात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३८ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली या पक्षाचा जाहीरनामा टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी दैनिकाची छापण्यात आला स्वतंत्र मजूर पक्षाच्या अध्यक्षीय भाषणामध्ये मनमाड या ठिकाणी ते म्हणतात ब्राह्मणशाही व भांडवलशाही भारतीय कामगारांचे मोठे दोन शत्रू आहेत भारत भूमीतील थोर असे महात्मा फुले म्हणतात शेठजी भटजी व लाटजी हे या देशाचे खरे शत्रू आहेत



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणतात पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती श्रमिक कष्टकरी शेतमजूर कामगार यांच्या तळहातावर तरलेली आहे.

थोर कवी नारायण सुर्वे म्हणतात कामगार आहे मी तळपती तलवार आहे रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे

वरील विवेचन सर्वार्थाने भारतीय अर्थव्यवस्था गतिमान करणे कामी कामगार वर्गाचे हित अधोरेखित होणे किती महत्त्वाचे आहे याचे वास्तव दिसून येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार शेतकरी कष्टकरी हिताचे निर्णय व विधेयक पास करून त्यांना घटनेच्या तरतुदींमध्ये सामाविष्ट केले अशाप्रकारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे कामगारवर्गाचे एकमेव तारणहार नव्हे तर उद्धारकर्ते आहेत असे समजण्यात आज ही कामगार व शेतकरी ,महिला अंधारात आहेत हे मोठं दुर्दैव आहे.

शेतकऱ्यांसाठी किमान वेतन दर असावा अशी मागणी त्यांनी विधिमंडळात केली. खोती पद्धत व कामगारांचे शोषण थांबवण्यासाठी बिल मांडले. कामगारांना संप करण्याचा कायदेशिर अधिकार मिळवून दिला. सावकारी नियंत्रण विधेयक तयार केले. मंत्रिमंडळात मजूर मंत्री असताना त्यांनी बरेच कायदे निर्माण केले या कायद्यातून कामगार हिताचे निर्णय करण्यात आला कामगार कल्याण योजना सेवा योजना कार्यालय भरपगारी रजा हे विधेयक १४ एप्रिल १९४४ रोजी पास केले केले. किमान वेतन कायदा १९४८ ची निर्मिती झाली.औद्योगिक कलह मिटवण्यासाठी लवादाची तरतूद केली .भारतातील कामगार आयातीवर त्यांनी प्रतिबंध लागले. महागाई भत्ता प्रसूतीच्या काळातील रजा कामावर गैरहजर असताना भरपगारी सुट्टी मिळाव्यात यासाठी प्रयत्न केले.

कामाचे तास आठ तास करण्यासंदर्भात बिल मांडले.कामगार भरपाई कायद्याची निर्मिती केली घटनेतील कलम ३९ नुसार पगारदार पुरुषा इतकीच त्या पदावर कार्यरत असणाऱ्या स्त्रियांनाही तेवढाच पगार मिळावा ही तरतूद केली. कलम ४३ नुसार शासनाने कामगारांचे जीवनमान सामाजिक व सांस्कृतिक संधी देण्याच्या उद्देशाने तरतूद केली. वेठबिगार हा गुन्हा आहे त्या संदर्भात कायदा केला.

अशा प्रकारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विशेष धोरण कायदे शेतमजूर कष्टकरी महिला यांच्या वरती अनंत कोटी चे उपकार आहे हे आजमितीस आपणास डावलून चालणार नाही याकरता बाबासाहेबांचे कार्य त्यांचे विचार आचार हे समजून घेणे अनिवार्य आहे. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये बाबासाहेब आंबेडकर यांनी भाकीत केले होते ब्राम्हणशाही व भांडवलशाही या देशाचे खरे शत्रू आहे. हे आज एकविसाव्या शतकामध्ये तंतोतंत लागू पडत आहे. आत्ताच आपण आरबीआय आणि केंद्र सरकार यांनी देशातील गरीब उद्योगपतींना जाहीर केलेली कर्जमाफी आपण बघितली ६८ हजार ६०७ कोटी रुपये रामदेव बाबा, विजय मल्ल्या, निरव मोदी, अशा पन्नास बड्या उद्योगपतींना कर्जमाफीचा लाभ या सरकारने दिलेला आहे.

या संकटाच्या पार्श्वभूमीवर आमचा कामगार या ठिकाणी पोटाचा प्रश्न, भुकेचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, जीवनमरणाचा प्रश्न, उपेक्षित जगणं, आरोग्य आणि या सर्वांमध्ये रोजंदारी मधली होणारी उपासमार यामध्ये रोज मरतो आहे. आमच्या शेतकऱ्यांचं कष्टकऱ्यांचे बहुजनांचे वेदना व्यवस्थेला कळत नाहीये याचं मोठं दुर्दैव आहे. म्हणूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची मार्गदर्शक तत्वे घटनेतील तत्त्वे या सरकारने लागू करणे कामगार हिताचे धोरण राबवून शेटजी आणि भटजी यांना या देशाची लूट या श्रमिकांची लूट या लोकशाहीची होणारी लूट या शेतकऱ्यांची होणारी लूट आमच्या आयाबहिणींची बहिणीची अधिकाराची होणारी लूट थांबवावी लागेल अन्यथा येणारा काळ हा विदारक असेल बहुसंख्य समाज हा आजही दारिद्र्यात निपचीत पडलेला आहे या बहुसंख्य लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याकरता कामगार हिताचे धोरण कामगार आणि त्याचे कायदे त्याची योग्य अंमलबजावणी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले लोकशाहीर आण्णाभाऊ साठे या देशातील लोकराजा छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांच्या विचारानुसार रयतेचे राज्य आणि बहुजनांचे कल्याणकारी राज्य लोकशाहीच्या चौकटीतील एक मुहूर्तमेढ साध्य होणारे राष्ट्र आम्हास घडवावे लागेल याकरिता लोकशाहीचे बाळंतपण तुम्हाला व आम्हाला करावे लागेल हेच आज जाणवत आहे.

**– डॉ.कुमार लोंढे,**
**सेंट्रल ह्यूमन राईट संघटन दिल्ली मो.९८८१६४३६५०**

पान १ वरुन

## शरद पवार यांनी मागितला दोन...

घेतली होती.त्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन पवार यांची भेट घेतली. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, अजित पवार, रोहित पवार, विद्या चव्हाण, चेतन तुपे, अशोक पवार, शेखर निकम हे उपस्थित होते. यादरम्यान अनेकांनी पक्षाच्या विविध पदाचे राजीनामे देण्यास सुरुवात केली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेत, शरद पवार यांच्याशी झालेल्या चर्चेची माहिती सर्वांना दिली. तसेच कोणत्याही कार्यकर्त्यांने राजीनामा देऊ नये. ज्यांनी राजीनामे दिले आहेत त्यांचे राजीनामे मंजूर करण्यात येणार नाहीत. त्यामुळे कुणीही राजीनामे देऊ नयेत, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## भ्रष्टाचार काँग्रेसचा आणि भाजपचाही..

लोकांपर्यंत पोहोचतात. म्हणजेच ८५ टक्के कमिशनमध्ये गायब होतात, विकास १५ पैशांचाच होतो! मोदींनी ४० टक्के कमिशनच्या भाजपच्या भ्रष्टाचाराची तीव्रता कमी करत काँग्रेसच्या ८५ टक्के भ्रष्टाचाराची भीती मतदारांना दाखवली आहे. मोदींनी भाषणामध्ये विकासावर सर्वाधिक भर दिला. मोदींचे म्हणणे होते की, केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून विकासाला गती मिळाली असून प्रकल्पांमध्ये वा योजनांमध्ये भ्रष्टाचार होत नाही. त्यामुळे पूर्ण १०० पैसे लोकांपर्यंत पोहोचतात. काँग्रेसने राबवलेल्या योजनांमध्ये वा प्रकल्पांमध्ये भ्रष्टाचार झालेला लोकांनी पाहिलेला आहे. विनाभ्रष्टाचार विकास साधायचा असेल तर केंद्रात आणि राज्यामध्ये भाजपचे सरकार सत्तेवर असले पाहिजे! मोदींनी अप्रत्यक्षपणे कर्नाटकमध्ये भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाची ग्वाही दिली. विद्यमान बसवराज बोम्मई सरकारमध्ये भ्रष्टाचार होत असेल पण, संधी मिळाली तर ही चूक दुरुस्त केली जाईल, असे मोदींनी सूचित केले.

देशाचा वेगाने विकास होत असताना कर्नाटकने मागे राहू नये. जिथे डबल इंजिन सरकार असते, त्या राज्याच्या विकासाला गती मिळते, केंद्राचे साह्य मिळते. पण, जिथे डबल इंजिन सरकार नाही, तिथे विकास गतीने होईल याची शाश्वती देता येत नाही, असा गर्भित इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वेगवेगळ्या भाषणांतून दिला आहे. मोदींनी हाच मुद्दा सौम्य शब्दांमध्ये आणि मतदारांना भावनिक आवाहन करत मांडला. कर्नाटकची निवडणूक म्हणजे आगामी लोकसभा निवडणुकीसाठी लिटमस टेस्ट नाही. पुढील २५ वर्षांमध्ये कर्नाटकच्या विकासाची दिशा निश्चित करणारी ही निवडणूक असल्याचे मोदी म्हणाले. कर्नाटकमध्ये काँग्रेसची सत्ता आली तर भाजपच्या सरकारपेक्षा अधिक भ्रष्टाचार होईल. शिवाय, डबल इंजिन नसल्यामुळे राज्यांना केंद्राकडून साह्यही मिळणार नाही. मग, कर्नाटकचा विकास कसा होणार? विकास हवा की भ्रष्टाचार हे मतदारांनी ठरवावे, असे आवाहन मोदींनी दोन दिवसांमधील प्रचारसभांमधून केले आहे. काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या विषारी सापाच्या टिप्पणीला मोदींनी प्रत्युत्तर देणे अपेक्षित होते. कोलारमधील प्रचारसभेत मोदी म्हणाले की, देशाची जनता ही शिवाचे रूप आहे. शिवाच्या गळ्यातील साप बनवण्यास मी तयार आहे! मोदींनी खरगेंना संयत उत्तर देऊन हा मुद्दा प्रभावहीन बनवून टाकला आहे.

## ‘राजद्रोह’ कायद्यातील ब्रिटिशकालीन

असे आदेश दिले होते. तसेच यापूर्वी दाखल गुन्ह्यांमध्ये तपास, प्रलंबित सुनावण्या आणि अन्य प्रक्रियांनाही स्थगिती दिली होती. देशाच्या स्वातंत्र्याच्या तब्बल ५७ वर्षे आधी, १८९० साली तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हा कायदा केला होता. यातील १२४अ अनुच्छेदानुसार सरकारविरोधात असंतोष प्रकट करणाऱ्यास जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या कायद्याचा वापर महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिकांविरोधात करण्यात आला. अलीकडच्या काळात खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, लेखिका अरुंधती रॉय, विद्यार्थी नेते उमर खालिद, पत्रकार सिद्दिकी कप्पन आदींवर गुन्हे दाखल झाल्यानंतर या कायद्याची पुन्हा देशभरात चर्चा सुरू झाली होती.

## राहुल गांधी यांच्या शिक्षेला अंतरिम

दाखल केली होती. सुरतच्या दंडाधिकाऱ्यांनी गांधी यांना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा ठाठावली होती. त्यामुळे त्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द झाले. दंडाधिकारी न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत सुरत सत्र न्यायालयाने गांधी यांची याचिका फेटाळली. त्याला आव्हान देत गांधी यांनी गुजरात उच्च न्यायालयात शिक्षेला अंतरीम स्थगितीची मागणी केली होती. न्या. हेमंत प्रच्छक यांच्या न्यायालयात सोमवारी आणि मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी झाली. गांधी यांचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी हे प्रकरण तातडीचे असून दोन्ही बाजूंचे युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर अंतरिम अथवा अंतिम आदेश देण्याची विनंती केली. मात्र खटल्याच्या या टप्प्यावर अंतरीम संरक्षण दिले जाऊ शकत नाही, असे न्या. प्रच्छक यांनी सांगितले. पुर्णेश मोदी यांचे वकील निरुपम नानावटी यांनीही सिंघवी यांच्या मागणीला विरोध केला. सर्व कागदपत्रे आणि सुनावण्यांमधील युक्तिवाद तपासून अंतिम आदेश दिला जाईल, असे सांगतानाच ८ मे ते ३ जून ही न्यायालयाची उन्हाळी सुट्टी संपल्यानंतरच यावर अंतिम आदेश दिला जाईल, असे न्या. प्रच्छक यांनी स्पष्ट केले.

## नियमित योग केल्याने शारीरिक

जिल्हा योग परिषद, योग असोसिएशन, रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट योग, नेहरू युवा केंद्र आणि योग सेवा मंडळाच्या सहकार्यातून या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. सदरील योग शिबिराला सुधा अळळीमोरे, संगीता जाधव, नंदकुमार चित्तापुरे, रघुनंदनदन भुतडा, रजनी दळवी, विजकुमार गुंजाळे, आनंद टाके, राजशेखर लक्ष्मेश्वर, बी एन पाटील, डी पी चिवडशेट्टी, रमेश सोनी, रोहिणी उपळाईकर, देवानंद चिलवंत, दत्तगुरू वेदपाठक, डॉ. शोभा शहा, जितेंद्र महामुनी, प्रकाश जाधव, सुहास देशपांडे, लता माळगे, राजू जुंजा, सुनील आळंदी आणि संगीता सुरेशजी जाधव मार्गदर्शन करणार आहेत. सदरील योग दिनानिमित्त केंद्रिय संचार ब्युरोच्या उइउडेश्ररीाी या फेसबुक, ट्विटर आणि इंस्टाग्राम हँडलवरून दररोज एक योग आसनांची चित्र व मजकुरासहित माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे योग सराव करण्यास मदत होणार आहे.

शिबिराची सुरुवात महर्षी पतंजली यांच्या प्रतिमेस पुष्पार्पणाने करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शिवस्मारकचे प्रमुख रंगनाथसा बंकापुरे, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, नेहरू युवा केंद्राचे जिला युवा अधिकारी अजितकुमार, राष्ट्रीय सेवा संघाचे चंद्रकांत पटवर्धन, गीता परिवारचे संगीता जाधव, सोलापूरच्या पतंजली योगपीठ चे प्रतिनिधी रघुनंदन भुतडा, भारतीय योग संस्थाचे अध्यक्ष डी पी चिवडशेट्टी, रोटरी क्लबचे विद्या मनुरे, लायन्स क्लबचे मोहन भुमकर आणि भारत स्वाभिमान ट्रस्टचे माधुरी पारपल्लीवार आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराची सुरुवात शंखध्वनीने करण्यात आली. जितेंद्र महामुनी यांनी सूर्य नमस्कार आणि आयुष्य मंत्रालयाने नेमून दिलेल्या प्रोटोकॉल प्रमाणे शिथिली करण्याचे व्यायाम, उभी व बैठे योगासने, पोटावरील व पाठीवरील योगासने, प्राणायाम आणि ध्यान धारणाचे सराव घेतले.

## सुदानमधून आतापर्यंत १ लाख ..

मदतीवर अवलंबून आहेत. गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या हिंसेमुळे त्यांच्यापर्यंत मदत पोहोचवण्यात अडथळे येत आहेत. सुदानमधून होणाऱ्या स्थलांतरामुळे शेजारील देशांवरही ताण येत असून यातून प्रादेशिक संकट निर्माण होणार असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सर्वाधिक स्थलांतर इजिप्तमध्ये झाले असून ४० हजारांपेक्षा जास्त नागरिक तिकडे गेले आहेत.

## महाराष्ट्रदिनी जिल्ह्यात ९ ठिकाणी

म्हणाल्या, ’आपला दवाखाना’ मध्ये बाह्य रुग्णसेवा, मोफत औषधोपचार, ३० प्रकारच्या प्रयोग शाळा चाचण्या, मोफत कार्यशाळा तपासणी, टेलि कन्सल्टेशन, गर्भवती माताची तपासणी, लसीकरणच्या सेवा देण्यात येणार आहेत. तसेच या व्यतिरिक्त महिन्यातून निश्चित दिवशी नेत्र तपासणी, बाह्य यंत्रणेद्वारे रक्त तपासणीची सोय मानसिक आरोग्यासाठी समुपदन सेवा, आवश्यकतेनुसार विशेषता संदर्भ सेवा, योगा व व्यायामबाबतीचे प्रात्यक्षिक देखील करण्यातयेणारआहेत.

# राज्य प्रशासनात मोठे फेरबदल; नितीन करीर यांची वित्त तर मिलिंद म्हैसकर यांची आरोग्य विभागात बदली

मुंबई : राज्याच्या मुख्य सचिवपदी मनोज सौनिक यांच्या नियुक्तीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी प्रशासनात फेरबदल करीत दहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दिले. त्यानुसार नितीन करीर यांची वित्त विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी तर मिलिंद म्हैसकर यांची आरोग्य विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी बदली करण्यात आली आहे. तुकाराम मुंढे यांना सहा महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्याशी झालेल्या वादंगानंतर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संचालक पदावरून हटविण्यात आलेल्या तुकाराम मुंढे यांची तब्बल सहा महिन्यानंतर आता पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या विभागात काम करण्याच्या मुंढे यांच्या इच्छेला विभागाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी होकार दिल्यानंतर निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले जे.पी. गुप्ता यांची बदली करून तेथे मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे आणि मंत्री तानाजी सावंत यांच्यात गेल्या काही दिवसांपासून शीतयुद्ध सुरू होते. सावंत यांच्या नाराजीनंतर अवघ्या आठ महिन्यातच खंदारे यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय दिनेश वाघमारे यांची गृह विभागाच्या प्रधान सचिवपदी (अपिले), राधिका रस्तोगी यांची अल्पसंख्याक विभागाच्या प्रधान सचिवपदी, संजीव कुमार यांची महापारेषण कंपनीच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. श्रावण हर्डीकर यांची मुंबई महापालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी, जी.श्रीकांत यांची छत्रपती संभाजीनगर महापालिका आयुक्तपदी तर अभिजित चौधरी यांची राज्य कर विभागात सह आयुक्तपदी आणि बी. शिवशंकर यांची शिर्डीच्या साईबाबा संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. आता महसूल विभागाच्या अप्पर मुख्य सचिवपदासाठी सुजाता सौनिक किंवा मनिषा म्हैसकर तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवपदासाठी असीम गुप्ता, सौरभ विजय आणि अनिल डिग्गीकर हे दावेदार मानले जात आहेत. म्हाडाच्या उपाध्यक्षपदी संजीव जयस्वाल यांची नियुक्ती होणार असल्याची चर्चा आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बार्शी शहर पोलीस स्टेशनची मोठी कामगिरी

## रस्त्याच्या कडेला उभा असलेल्या ट्रकमध्ये ६३ लाखाचा गुटखा

## बार्शी पोलिसांकडून ८८ लाख ७० हजाराचा मुद्देमाल जप्त



बार्शी/प्रतिनिधीः गेल्या काही दिवसांपासून अवैध गुटखा वाहतुकीवर बार्शी पोलिसांनी विशेष लक्ष दिले आहे. शहरातून अशाप्रकारे संशयित वाहतूक होत असल्यास संबंधिताला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली जात आहे. एप्रिल महिन्याच्या सुरवातीलाच अशाप्रकारे कारवाई केल्यानंतर याच महिन्याच्या शेवटच्या दिवशी देखील बार्शी पोलिसांनी अशीच दबंग कामगिरी केली आहे. शहर हद्दीतील लातूर रोडवर उभा असलेल्या ट्रकमधून अवैध गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांच्या एका पथकाने ट्रकची पाहणी केली असता त्यामध्ये ६३ लाख ७० हजार किंमतीचा हिरा कंपनीचा गुटखा त्यामध्ये हिरा पान मसालाच्या एकूण ३९० गोण्या ताब्यात घेण्यात आल्या तर वाहतूक करणारा ट्रक असा एकूण ८८ लाख ७० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**एमआयटी कॉलेजवळ कारवाई**

बार्शी-लातूर रोडवरील एमआयटी महाविद्यालयाजवळ एक ट्रक उभा असल्याची माहिती बार्शी शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरिक्षक संतोष गिरीगोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करण्यात आले उभा असलेल्या ट्रकमध्ये नेमके काय आहे याचा शोध सुरु झाला. सुरवातीला ट्रकमधील दोघांनी उडवाउडवीची उत्तरे दिली मात्र, तपासाअंती ट्रकमध्ये हिरा कंपनीचा गुटखा असल्याचे निदर्शनास आले. यानंतर पोलिसांनी ट्रक आणि त्यामधील दोघांना ताब्यात घेतले. ट्रकमध्ये एकूण ६३ लाख ७० हजाराचा गुटखा असल्याचे निदर्शनास आले आहे.

**पोलिसांकडून एकाचा फोन ताब्यात**

गुटखा वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकास बार्शीतील एकाचा फोन आला होता. यासंबंधी बार्शी पोलिसांनी माहिती दिली नसली तरी सुत्रांच्या माहितीनुसार बार्शीतील एका व्यक्तीचा फोन संबंधित ट्रक चालकास आला होता. त्यानुसार त्या व्यक्तीचा मोबाईल ताब्यात घेण्यात आला आहे. गुटखा वाहतूक आणि त्या व्यक्तीचे काय कनेक्शन आहे याचा तपास देखील होणे तेवढेच गरजेचे आहे. त्या व्यक्तीने ट्रक चालकास फोन केला होता त्यावेळी चालकाचा मोबाईल हा पोलिसांच्या ताब्यात होता. त्यामुळे ही घटना उघडकीस आली. त्यामुळे गुटखा वाहतूक आणि बार्शी कनेक्शन काय आहे का? याचा तपास होणे देखील तेवढेच गरजेचे आहे.

**मालाची वाहतूक करताना मजुरांचीही दमछाक**

पोलिसांनी जो ट्रक ताब्यात घेतला आहे त्यामध्ये गुटख्याच्या तब्बल ३९० गोण्या आणि तंबाखूच्या २०० गोण्या अशा मिळून ५९० गोण्या होत्या. गुटखा तपासणीसाठी ट्रकच्या खाली उतरवताना मजुरांची अक्षरशः दमछाक झाली होती. तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारीही दाखल झाले होते.

**महिन्याभरात बार्शी पोलिसांची दुसरी कारवाई**

एप्रिल महिन्याच्या सुरवातीलाच पोस्ट चौकामध्ये बार्शी पोलिसांनी अवैध गुटखा वाहतूक करणारा ट्रक ताब्यात घेतला होता. त्यानंतर ही शनिवारी रात्री ही कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक शिरीष देशपांडे, अप्पर पोलिस अधीक्षख हिम्मत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक संतोष गिरीगोसावी, सपोनि. सुधीर तोरडमल, सपोनि उदार, कर्णेवाड, शिरसट तर गुन्हे शाखेचे शैलेश चौगुले, अमोल माने, मनिष पवार, वैभव ठेंगल, ज्ञानेश्वर घोंगडे, अर्जुन गोसावी, रविकांत लगदिवे, अविनाश पवार, अंकुश जाधव यांनी ही कारवाई केली आहे.

# राजधानीत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



नवी दिल्ली : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६३ वा वर्धापन दिवस राजधानी दिल्लीत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. उभय महाराष्ट्र सदनात प्रभारी निवासी आयुक्त श्रीमती निवा जैन यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. कस्तुरबा गांधी मार्गस्थित आणि कोपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदनात ध्वजारोहण झाले. यावेळी राष्ट्रगीता सोबत राज्यगीत 'गर्जा महाराष्ट्र माझा...' उपस्थितांनी गाऊन ध्वजवंदन केले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी कस्तुरबागांधी स्थित महाराष्ट्र सदनाच्या परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पअर्पण करुन अभिवादंन केले.

या कार्यक्रमास राज्यसभेचे खासदार इमरान प्रतापगडी, सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार, महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राचे अधिकारी-कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक, महाराष्ट्र सदनात निवासी असणारे अभ्यागंत, दिल्लीस्थित महाराष्ट्र शासनाच्या विविध कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि दिल्लीत विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कस्तुरगांधी स्थित महाराष्ट्र सदन येथे सांस्कृतिक कार्य संचालनालय व महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पदमावती कला संस्कार समुहाच्यावतीने महाराष्ट्र दिनाचे महत्व सांगणारा सांस्कृतिक कार्यक्रम सायंकाळी चार वाजता पासून सुरु होणार आहे.

यासह सार्वजनिक उत्सव समिती यांच्यावतीने माणिक निर्मित अतुल अरुण दाते प्रस्तुत ललना मना कवियत्री, गीतकार, स्त्री संगीतकार, कथा लेखिका , दिग्दर्शिक , निर्मित्या यांना मानाचा मुजरा... स्त्री कलानिर्मितीची ७०० वर्ष !! असा सांस्कृतिक कार्यक्रम आज सायंकाळी ६ वाजता श्रीराम सेंटर, मंडी हाऊस येथे होणार असून दोन्ही कार्यक्रम महाराष्ट्र दिनानिमित्त खास मराठी बांधवांसाठी आयोजित करण्यात आले आहेत. या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित राहून मनमुराद आनंद लुटावा, असे आयोजकांच्यावतीने आव्हान करण्यात आले आहे.

# येडोळा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मिरवणूक




वागदरी/ एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील मौजे येडोळा येथे , महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त भाव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली यावेळ येडोळा गांवचे सरपंच पद्माकर पाटील उपसरपंच सौ .लक्ष्मी जाधव व राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे तालुका सरचिटणीस रवी पाटील , ग्राहक संरक्षण कक्ष विभाग शिवसेना प्रमुख मेजर राजेंद्र जाधव ,युवा नेते अभिषेक पाटील , आरपीआयचे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र लोंढे,भाजप तालुका उपाध्यक्ष नवनाथ जाधव ,

जयंती कमेटी अध्यक्ष मारुती लोंढे,सिद्रार्थ युवा तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रवीण कांबळे,राम लोंढे,अमित लोंढे,भानुदास लोंढे , मल्हारी लोंढे , सुरेश लोंढे , देवानंद लोंढे , सुरज लोंढे , सुरज गायकवाड , राजेंद्र कांबळे , रमेश लोंढे , सोपान गायकवाड , अभिषेक लोंढे सर्व भीम सैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यामुळे महाविकास आघाडीला मोठा फटका बसणार

## - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची प्रतिक्रिया

### राष्ट्रीयस्तरावर विरोधी पक्षांच्या एकजुटीला खीळ बसणार



मुंबई : ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीला मोठा फटका बसणार आहे. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरोधात विरोधी पक्षांच्या एकजुटीचे चाललेले प्रयत्न खिळखिळे होणार आहेत. राष्ट्रीयस्तरावर विरोधी पक्षाच्या एकजुटीला खीळ बसणार आहे असे मत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज प्रतिक्रीया देतांना व्यक्त केले आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी माझे अत्यंत जवळचे संबंध राहिलेले आहेत. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद; केंद्रात कॅबीनेट मंत्रीपद भुषविलेले आहे. त्यांना राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव राहिलेला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देशात त्यांनी राजकीय पटलावर आपल्या नेतृत्वाचा अमीट ठसा उमटविलेला आहे. संपूर्ण देशात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन चांगले वाढविले आहे. महाराष्ट्रात प्रमुख पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे स्वतंत्र अस्तित्व उभे आहे. त्यांच्या सारखे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दुसरे मिळु शकत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद शरद पवारांनी सोडल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस खिळखिळी होईल. शरद पवारांएवढे उत्तुंग नेतृत्व इतर कोणताही नेता राष्ट्रवादी काँग्रेसला देऊ शकत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस ज्या ताकदीने शरद पवारांनी चालविली त्या ताकदीने इतर कोणताही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चालवु शकत नाही. भविष्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कमजोर होत जाईल असे ना.रामदास आठवले यांनी आपले मत व्यक्त केले आहे.



# तहसिल कार्यालयात ध्वजारोहण संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या६३व्या वर्धापन दिनानिमित्त प्रांताधिकारी गजानन गुरव यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

तहसिल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळयास तहसिलदार सुशिल बेल्हेकर, अप्पर तहसिलदार समाधान घुटूकडे,गटविकास अधिकारी प्रशांत काळे, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंडीत कोळी, वैभव बुचके, बाल विकास प्रकल्प अधिकारी अमृत सरडे उपस्थित होते. यावेळी पोलीस पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.याप्रसंगी स्वांतत्र्यसैनिक, शासकीय अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व नागरीक उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी विद्यालयातील दोन विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र

अक्कलकोट/प्रतिनिधीः सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा एनएमएमएस परीक्षेत सलग दूसऱ्या वर्षी घवघवीत यश मिळवले आहे.या परीक्षेत एकूण ९ विद्यार्थी उत्तीर्ण असून पैकी दौलप्पा देवराया कोळी यास दरमहा दहा हजार प्रमाणे पाच वर्षे एकूण ६० हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे. तर सारथी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थीनी कु.ज्ञानेश्वरी बाळू मोरे यांना दरमहा ८ हजार प्रमाणे चार वर्षे असे एकूण ३८४०० रूपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. या दोन एनएमएमएस शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचे व त्याना मार्गदर्शन करणारे शिक्षक गौरीशंकर कोनापुरे व दिपक गंगौडा यांचे संस्थेचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यानी कौतुक करून अभिनंदन केले.जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी,संचालिका शांभवी कल्याणशेट्टी,संचालक मल्लिकार्जुन मसुती, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, ज्यु.कॉलेज प्रमुख पूनम कोकळगी, प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व सर्व शिक्षकानी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# दुधनी बाजार समिती नूतन संचालक निंगण्णा पुजारी यांचं सत्कार




अक्कलकोट/प्रतिनिधी :नाविंदगी विकास सोसायटी चेअरमन निंगण्णा पुजारी यांची दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालकपदी बहुमताने निवड झाल्याबद्दल नाविंदगी गावकरी व शरणु गायछोडे मित्र परिवार(ग्रा.पं.सदस्य नाविंदगी) बसवेश्वर मित्र मंडळ यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले.यावेळी गावचे सरपंच पंडीत चव्हाण ग्रामपंचायत सदस्य व सोसायटी सदस्य गावातील तरुण मंडळी व जेष्ठ नागरिकांडुन निंगण्णा पुजारी यांच अभिनंदन करुन शुभेच्छा देण्यात आले.

# तीन दुचाकींना आग

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर रेल्वे स्थानक परिसरात मंगळवारी रात्री तीन दुचाकींना आग लागल्याची घटना घडली. या आगीत तीनही दुचाकी जळून खाक झाल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर रेल्वे स्थानक परिसरातील दुचाकी पार्किंगच्या ठिकाणी लावलेल्या पल्सर, स्कुटी व अन्य एका दुचाकीला अचानकपणे आग लागली. घटनास्थळी रेल्वे सुरक्षा बल दाखल झाले. त्यानंतर आगीची माहिती अग्निशामक दलाला मिळाल्यानंतर त्वरित अग्निशामक दलाचे अधीक्षक केदार आवटे हे त्यांच्या पथकांसमवेत घटनास्थळी दाखल झाल

# शब्दकोडे क्र १२२



आडवे शब्द १. वस्त्र ३. त्याप्रमाणे ५. अशा माणसाकडे काहीही काम सोपवू नये ११. निश्चय १२. डोळ्याच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण १४. पुन्हा १५. कधीही पोळे न सोडणारी १६. मुक्काम १८. ओसाड, वैराण १९. पौर्णिमा २०. लेखणीचा आधुनिक प्रकार २१. वेल २३. साडीच्या खालच्या भागाला लावलेली अस्तराची किनार २४. बाव, झावळीच्या पातीमधील काडी २५. सूर्यास्ताआधी २७. लक्ष - पण भान नाही २९. तोरा ३२. आवरण ३५. पदवी ३६. सूट ३७. सर्वात लहान ३९. सर्वात मिळून, सर्वांचे ४०. अपुरा ४२. रोटीचा प्रकार ४३. गोष्ट ४४. तीव्र लोभ ४५. सत्तेवर आलेला ४८. आर्जवे ५०. भित्रा ५२. डुक्कर ५४. दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ ५६. चांदी ५८. सैनिक ६०. सुळका ६१. पृथ्वी ६३. व्यायामप्रकार, अवघड कामगिरी ६४. शहाणपण यावर अवलंबून नसते ६६. लिंबाची निरूपयोगी जात ६७. एकाच वेळी, अचानक ६९. अंत:करण ७१. शेवट ७३. जोग धबधबा या नदीवर (कर्नाटक) आहे ७४. सहजगत्या ७६. वेग ७९. हक्क सांगणे ८१. प्रमाद ८३. लहान मुलाची तुमान ८४. गुंड ८५. टेंभा ८७. बंदुकीने केलेला हल्ला ९१. चोप ९३. इंद्राची पत्नी ९४. सावध ९७. स्वच्छ ९८. ऋण ९९. अंदाज १००. एक शेंगभाजी १०२. गंध, परिमल १०४. टिंगल १०५. राजस्थानी स्त्रियांच्या पेहरावातील नक्षीचा घोळदार परकर १०६. घाणेरडे १०७. टोकदार १०८. श्रम १०९. ऋषी

उभे शब्द १. स्थापनादिवस २. हा प्राणी स्वत:चा रंग बदलू शकतो ३. पोहण्यासाठी बांधलेला तलाव ४. सर्प ५. शंकराचे प्रिय फळ ६. पूर्वज ७. माळजमीन ८. दंत ९. 'अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळी.....' १०. विलंब, दिरंगाई १३. डोक्याचा केस गळून गेलेला भाग १५. जंगल १७. दूरचा फेरा ह्न बहुदा उगाच पडणारा १९. रोमांच २२. लकेर २६. विधानातील स्पष्ट विसंगती २८. आजीच्या जमान्यातील बिनविजेचा मिक्सर-ग्राईंडर! ३०. परिमार्जन ३१. अतिशय हानिकारक ३३. व्रत ३४. कमळ, मुलाचे एक नाव ३५. सज्जन ३६. डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन ३८. राजवाडा ४१. कौशल्य ४२. स्त्री ४५. प्रारब्धदेवता ४६. प्रवाह ४७. तुरूंग ४८. कुरळे केस ४९. अभिमानास्पद ५१. फुलातील पराग ५२. साबुदाण्याचा तळीव पदार्थ ५३. आक्षेप ५५. श्रीकृष्णाच्या जीवावर उठलेली मावशी ५७. युद्धातील यश ५९. गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचे हाड ६०. मान्य ६२. हाक ६५. कलिका ६८. चिलट ६९. तनू ७०. सर्वांना ठाऊक झालेले ७२. जर, जेव्हा ७५. स्थूल ७७. किनारा ७८. किरकोळ, फालतू ८०. डावा ८१. शेगडी ८२. ताकद ८६. विज्ञान ८७. अडचण ८८. बडबडगीतांची शाळा ८९. मृदंग ९०. शर्विलक ९१. मत्स्य ९२. स्वातंत्र्य ९३. साखर ९५. सार्वजनिक वाहतुकीचे अवजड वाहन ९६. मोठी सुई ९९. सुदृढ, मजबूत १००. निवृत्तीनाथांचे गुरु, नऊ नाथांपैकी एक १०१. कुमक १०३. पूर्व दिशा

# प्रतिष्ठेची लढाईत 'अण्णा'चा गड गेला..!

# भाजपाला बारा बारा, काँग्रेसला सहा सहा

## आप्पानी गड राखला,दादा ठरला किंगमेकर





विश्वनाथ चव्हाण / अक्कलकोट : आप्पा,दादाच्या राजकीय खेळीत,बालेकिल्ला असलेल्या दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती आणाच्या हातून निसटली, प्रतिष्ठेची लढाईत अण्णा'चा गड गेला,आप्पानी गड राखला,किंगमेकर दादामुळे अक्कलकोटमध्ये भाजपाचा डंका वाजल्याने कॉग्रेससाठी ही भविष्यातील धोक्याची घंटा असल्याचे बोलले जात आहे.

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या अक्कलकोट व दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत १२ जागा जिंकून आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील गटाची सत्ता स्थापन झाली आहे. दुधनी या ठिकाणी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या प्रतिष्ठेच्या लढाईत दारुण पराभव झाला असून त्यांना या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. दुधनी बाजार समितीच्या स्थापनेपासून म्हेत्रे गटाची एक हाती सत्ता होती.ती उलटून टाकण्यामध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांना मोठा यश आला आहे.दोन्ही बाजार समितीत १८जागांपैकी १२, १२ जागा जिंकून सत्ता काबीज केली आहे.

नुकत्याच लागलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचा निकाल आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांची तालुक्याच्या राजकारणावर असलेली मजबूत पकड अधोरेखित करणारा असून हा निकाल अक्कलकोट तालुक्याच्या राजकारणाच्या भविष्यातील दिशा देणारा व विरोधकांच्या मर्यादा स्पष्ट करणारा आहे. माजी आ.सिद्रामप्पा पाटील व आ.सचिन कल्याणशेट्टी हे बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हितासाठी कसे पाहते हे देखील महत्त्वाचे ठरणार आहे. तालुक्याच्या सहकार क्षेत्रात माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचा दबदबा कामय अबाधीत राहिला असुन साखर कारखानासह सहकार संस्था देखील त्यांच्या ताब्यात आहेत.बाजार समितीला राजकीय महत्त्व असते.बाजार समिती निवडणुक लढवणाऱ्यांना प्रत्येक ग्रामपंचायत सदस्य व विविध कार्यकारी सोसायटीच्या सदस्याना मतदानाचा हक्क आहे. ग्रा.प. सदस्य व सोसायटी सदस्यानी मतदान करतात त्यामुळे या बाजार समितीच्या निवडणुकीतून नेत्याची खरी पत समजते म्हणून या बाजार समितीने पुढील निवडणुकीचा रंगीत तालीम म्हणुन पाहिले जाते.

बाजार समितीच्या निवडणुकीमुळे भविष्यातील निवडणुकीची सत्ताधाऱ्यांना आत्मविश्वास वाढला आहे.तर निवडणुकीत पराभव झालेल्या विरोधकांनी आपल्याकडून काय चुका झाल्या आणि आपण कुठे कमी पडलो याचा अभ्यास नक्कीच करतील. दुधनी कृषी बाजार समितीवर विजय मिळवल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांना बळ मिळाला आहे.सचिन कल्याणशेट्टी हे कार्यक्षम,उत्तम,गतिमान,प्रामाणिक जबाबदार,

दूरदृष्टी आणि कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी तालुक्याला मिळाल्याची चर्चा मतदारसंघात सुरू झाल्या आहे.

ग्रामीण भागातील मिनी विधानसभा असलेल्या अक्कलकोट,दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती ही युवक कार्यकर्त्यांसाठी महत्वाची निवडणूक आहे. या निवडणुकीचा पाया ग्रामीण भागातूनच रचला जात असून यात कॉग्रेसचे पानिपत होऊन भाजपाने एक हाती सत्ता काबीज केल्याने माविआ 'ला ही आगामी निवडणुकीसाठी धोक्याची घंटा समजले जात आहे.

त्यादृष्टीने कॉग्रेसला आता आत्मपरीक्षण करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' पंढरपूर येथे कार्यान्वित

## नागरिकांना मिळणार वेळेत, दर्जेदार आरोग्य सुविधा : डॉ.एकनाथ बोधले

पंढरपूर/प्रतिनिधीः जिल्ह्यासह तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' योजना सुरू केली आहे. समाजातील सर्व सामान्य नागरिकांना वेळेत व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी ही योजना सुरु करण्यात आली असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांनी सांगितले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आज मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व आरोग्यमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत यांच्या उपस्थित ऑनलाईप्रणालीव्दारे सांगोला नाका (क्लॉक रुम) यमाई तुकाई मंदिरा जवळ असणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मा.आमदार प्रशांत परिचारक, प्रांताधिकारी गजानन गुरव, तहसिलदार सुशिल बेल्हेकर,अप्पर तहसिलदार समाधान घुटूकडे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे,उपमुख्य अधिकारी सुनील वाळुंजकर,माजी नगरसेवक वामन बंदपट्टे, डी.राज. सर्वगोड, अनिल सावंत, सोमनाथ आवताडे, महेश साठे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी व आरोग्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या योजनेद्वारे मोफत उपचार, तपासणी आणि औषधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. 'आपला दवाखान्यात' बाह्य रुग्णसेवा मोफत औषध




उपचार मोफत कार्यशाळा तपासणी, टेली कन्सल्टीशन, गर्भवती माताची तपासणी ,लसीकरणच्या सेवा देण्यात येणार आहेत. तसेच या व्यतिरिक्त महिन्यातून निश्चित दिवशी नेत्र तपासणी, बाह्य यंत्रणेद्वारे रक्त तपासणीची सोय मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन सेवा, आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा, योगा व व्यायामबाबतीचे प्रात्यक्षिक देखील करण्यात येणार आहेत.बाह्यरुग्णसेवेची वेळ दुपारी २.०० ते रात्री १०.०० पर्यंत असणार आहे. अल्पावधीत सारडा भवन जवळील क्लॉक रुम व जिल्हा परिषद शाळा इसबावी आरोग्य वर्धीनी केंद्र येथे हिंदुहृदयसम्राट सम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' कार्यान्वित होणार असल्याचे डॉ. बोधले यांनी सांगितले.

पंढरपूर शहरातील तसेच परिसरातील सर्व सामान्य नागरिकांना हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' योजनेततर्गत आवश्यक व तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असल्याने नागरिकांना या सुविधेचा निश्चित लाभ होणार असल्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितले

नागरिकांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' योजनेच्या मोफत आरोग्य सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी यावेळी केले.

यावेळी उपस्थितांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यात उपलब्ध सोयी-सुविधांची पाहणी करुन माहिती घेतली.



# गोगांव येथे ग्रामपंचयत आणि जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्र दिन साजरा

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या६३व्या वर्धापन दिनानिमित्त उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण संपन्न झाले.ग्रामपंचायत कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळा कार्यक्रम अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सदस्य महादेवी होळे, हे होत्या, आरोग्यसेविका अंबिका वळसंग, कल्लप्पा बनसोडे, प्रमुख उपस्थिती होते यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिमा पूजन तंटा मुक्त अध्यक्ष सूर्यकांत जिरगे व शरणप्पा कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत घेवून कार्यक्रम सांगता करण्यात आले यावेळी अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, तेजाबाई गुरव पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड,आशा सेविका मधुमती गायकवाड आदी मान्यवर व नागरीक उपस्थित होते.जिल्हा परिषद शाळा येथे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आले यावेळी महात्मा गांधी प्रतिमा पूजन पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, आशा सेविका मधुमती गायकवाड, अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, तेजाबाई गुरव यांच्या हस्ते करण्यात आले ध्वारोहण मुख्याध्यापक दयानंद चोळे यांनी केले यावेळी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत घेण्यात आले , विद्यार्थीना खाऊ वाटप आरोग्य सेविका अंबिका वलसंग यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी महादेव चव्हाण, विजयकुमार गायकवाड, चीतानंद सोनकांबळे, कार्यक्रम सूत्रसंचालन बाबासाहेब बनसोडे यांनी केले आभार पुंडलिक वाघमारे यांनी केले

# आचेगांव येथे महाराष्ट्रदिन व कामगार दिन उत्साहात साजरा

आचेगांव/प्रतिनिधीः आचेगांव ता. दक्षिण सोलापूर येथे ग्रामपंचायत कार्यालय व जिल्हापरिषद प्राथमिक मराठी शाळेत महाराष्ट्रदिन व कामगार दिन या निमित्ताने ध्वजारोहण व प्रतिमा पूजन करण्यात आले. जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत देशाचे पहिले कामगारमंत्री तथा घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भाजप अनु. जाती तालुकाध्यक्षमाजी सरपंच बलवान गोतसुर्वे व सूर्यकांत धुते यांच्या हस्ते करण्यात आले व ध्वजारोहण ओगसिद्ध खांडेकर (मेजर) यांच्या हस्ते करण्यात आले तर ग्रामपंचायत समोरील ध्वजारोहण सरपंच सौ. विश्रांती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. विश्रांती पाटील हे होते. यावेळी उपसरपंच रफिक मुल्ला, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश गोतसुर्वे,मुख्याध्यापक राजशेखर कोळी,ग्रामपंचायत सदस्या श्रीम. मंगल गोतसुर्वे, सौ, गौतमी गोतसुर्वे, जयश्री खांडेकर,रेश्मा पाटील,ग्रामपंचायत सदस्य नागप्पा कांबळे, मलकारी कोरे,राजकुमार उपाध्ये, शशिकला विधाते आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक व स्वागत शिवानंद भीमान्नवरू यांनी केले.यावेळी मनोगतात माजी सरपंच बलवान गोतसुर्वे यांनी महाराष्ट्रदिनव कामगार दिनाबद्दल माहिती सांगितली.सरपंच विश्रांती पाटील यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

यावेळी मल्लू शिलेणी, नित्यानंद खोबण,शिक्षक अशोक सोलापुरे,नागनाथ पोतदार,शिक्षिका प्रतिभा दूधगी,गीता माडकर,शावरसिद्ध माळी, हिरा उपाध्ये, सिद्धू नवगिरे,उत्तरेश्वर सुर्वे, रवी विधाते आदिसह पालक शिक्षक-शिक्षिका , अंगणवाडी सेविका विध्यार्थी, गावकरी उपस्थित होते.

आभार मुख्याध्यापक राजशेखर कोळी यांनी मानले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने नळदुर्ग शहर दुमदुमले

## बोरीधरण उशाला कोरड पडली घशाला .ऐन मिरवणुकीत बौद्धाची पाण्यासाठी भटकंती

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग या ऐतिहासिक शहरांमध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांची १३२ वी जयंती खूप मोठ्या उत्साहा मध्ये ढोल ताशाच्या गजरात शोभेचे दारू लेझीम पथकाच्या सादरी करणात संपन्न झाली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने नळदुर्ग शहरात दिनांक १४ एप्रिल २०२३ ते २९ एप्रिल २०२३ या पंधरवड्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या मध्ये रांगोळी स्पर्धा , निबंध स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा विविध गुणदर्शन विविध स्पर्धा , घेऊन त्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण दि २९ एप्रील रोजी घेण्यात आला याचबरोबर याच कार्यक्रमात दैनिक साप्ताहिक नळदुर्ग टाइम्स या वृत्तपत्राच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक प्रकाशित करण्यात आला

या अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी महाराष्ट्र राज्य पोलीस दल तक्रार प्राधिकरणाचे न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर रिपाईचे जिल्हा सचिव एस के गायकवाड वंचितचे बाबा वाघमारे ज्ञानेश्वर पाटील नळदुर्ग ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर गोरे पत्रकार तथा शिक्षक भैरवनाथ कानडे परभणी येथील कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी रिपाईचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे शहर कार्याध्यक्ष महादेव कांबळे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे सुंदर आसे तैल चित्र तयार करून प्रदर्शित करणारे निखिल ठाकूर नळदुर्ग टाईम्स चे मुख्य संपादक दादासाहेब बनसोडे यांच्या हस्ते



करण्यात आले . यावेळी विशेषकांचे प्रकाशन करण्यात आले.

नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला ओळख आहे असून या शहरांमध्ये डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांची मिरवणूक खूप मोठ्या पद्धतीने करण्यात आली परतू एन मिरवणुकीच्या रणधुमाळी नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला बुद्ध नगर व आंबेडकर नगर ला पाणी सोडण्याचा विसर पडला आठ दिवसात पाणी येत असून नगरपरिषदेच्या पाणीपुरवठ्याच्या कर्मचाऱ्यांनी खोडसापणा केल्याचे दिसून येत आहे .या मिरवणुकीमध्ये सर्व गावातील विविध पक्षांचे पदाधिकारी विविध संघटनांचे पदाधिकारी सर्व पत्रकार व्यापारी मंडळाचे पदाधिकारी आदीने डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन पुष्प करून जयंतीच्या जल्लोषात सहभाग नोंदविला याचबरोबर शहर आणि परिसरातील भीमसैनिक या जयंती मध्ये सहभाग नोंदवाला ही मिरवणूक नळदुर्ग पासून कसाही गल्ली किल्ला गेट पोलीस ठाणे क्रांती चौक चावडी चौक शास्त्री चौक नवी पेठ मार्गे डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक बुद्धनगर आंबेडकर नगर मार्गे भीमनगर मध्ये या मिरवणुकीची सांगता करण्यात आली मिरवणुकीचा समारोप नळदुर्ग ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर गोरे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतीमेचं पुजन करून समारोप करण्यात आला यावेळी बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी त्रिशरण पंचशील सर्वांना दिले अमरदीप लेझीम संघाच्या सदस्याने खूप चांगल्या पद्धतीने डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मिरवणुकीमध्ये आपली कला सादरीकरण केले

यावर्षाची मिरवणूक रेकॉर्ड ब्रेक झाली नळदुर्ग करांचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे . शहरातुन भव्य मिरवणूक काढण्यात आली ही मिरवणूक यशस्वी करण्यासाठी भिमसैनीकानी परिश्रम घेतले

# महाराष्ट्राच्या वैविद्यपूर्ण सांस्कृतिक कला सादरीकरणाने 'महाराष्ट्र दिन' राजधानीत साजरा

नवी दिल्ली/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याच्या ६३ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात वासुदेव नृत्य, जात्यावरील ओवी, गोंधळ, धनगर नृत्य, भारूड, पोवाडा, अभंग गायनासह 'महाराष्ट्र गीत' आदि समृध्द लोककलांच्या दमदार सादरीकरणाने राज्याच्या वैविद्यपूर्ण संस्कृतीचे दर्शन महाराष्ट्र सदनात घडले.

कस्तुरबागांधी मार्गस्थित महाराष्ट्र सदनाच्या बँक्वेटहॉल मध्ये आज सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. महाराष्ट्र सदनाच्या प्रभारी निवासी आयुक्त निवा जैन यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी राजस्थान सदनाचे निवासी आयुक्त धीरज श्रीवास्तव, महाराष्ट्र सदनाचे सहायक निवासी आयुक्त डॉ राजेश अडपावार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याच्या वर्धापन दिनानिमित्ताने आज राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिल्लीतील महाराष्ट्र सदनानेही यानिमित्त राज्याच्या समृध्द सांस्कृतिक, ऐतिहासिक वारश्याचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पदमावती कला संस्कार संस्थेच्या कलाकारांनी यावेळी सादरीकरण केले.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक वारश्याचे दर्शन

श्री गणेशाच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात होऊन महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पहाटेचे दर्शन घडविणारे वासुदेव नृत्य तसेच घरा-घरांमध्ये जात्यांवर दळण दळतांना गायिल्या जाणाऱ्या ओवीचे सादरीकरण झाले.

रांगड्या आवाजात डफाच्या तालावर शिवाजी महाराजांच्या पोवाडयाने मनाचा ठेका धरला. अंबेच्या जागरण, गोंधळ सादरीकरणाने




संपूर्ण वातावरण भारावले. गाण्यातून रामाचा वनवास आणि स्त्री शक्तीचा जागर घडविला. प्रेक्षकांची नावे सांकेतिक भाषेतून मंचावरून सांगण्यात आली. या हातवारे करून गुप्त भाषेतील कलेला उपस्थित रसिक प्रेक्षकांनी टाळ्यांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या समृध्द लोक संस्कृतीचे प्रतिबिंब उभे केले आणि यास उपस्थितांचा उत्सफूर्त प्रतिसाद लाभला. आज सकाळी उभय महाराष्ट्र सदनात प्रभारी निवासी आयुक्त श्रीमती निवा जैन यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले.